लोकमत

# विद्यापीठ निवास राखीव ठेवा

कोल्हापूर : कोरोनाचा वाढता संसर्ग आणि दवाखान्यांमध्ये उपलब्ध नसलेले बेड ही स्थिती लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठातील रिकाम्या निवासस्थानांची दुरुस्ती करण्यात यावी. ही निवासस्थाने विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात यावीत, अशी मागणी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केली आहे.

या बेडसंदर्भातील गांभीर्यता लक्षात घेता, रिकाम्या निवासस्थानांची दुरुस्ती करण्यात यावी. शिक्षक, कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवावीत ज्यामध्ये सेवक आणि कुटुंबीयांची व्यवस्था होईल, असे निवेदन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना उपकुलसचिव विलास सोयम यांनी गुरुवारी दिले.

# शिवाजी विद्यापीठात दोन दिवसांत रुग्णालय

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ एनसीसी ऑफिसशेजारील वसतिगृहात ४५० बेडची क्षमता असणारे कोरोना केअर सेंटर सुरु करण्यासाठी आणखी दोन दिवसांचा अवधी लागणार असल्याची माहिती महापालिका प्रशासनाने शुक्रवारी दिली. कोल्हापूर शहरात ५०० पेक्षा जास्त कोरोनाचे रुग्ण आढळून आले. यामुळे महापालिका, जिल्हा प्रशासन यांच्यावर प्रचंड ताण आला आहे. सर्व शासकीय रुग्णालये भरली आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने लक्षण नसलेल्या रुग्णांसाठी स्वतंत्र कोरोना केअर सेंटर सुरु केली जात आहेत.